नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : १४९ | किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




गुरुवार, दि. ३० एप्रिल २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

# अभिनेता विजयची TVK पार्टी 120 जागा जिंकण्याची शक्यता

## द्रमुकला धक्का?

मुंबई : (स. गांवकरी)

पश्चिम बंगालमधील दुसऱ्या टप्प्याचं मतदान झाल्यानंतर विविध संस्थांकडून एक्झिट पोल जाहीर करण्यात आले आहेत. तामिळनाडूमध्ये द्रमुक आणि काँग्रेस पुन्हा सत्तेत येईल असा अंदाज बहुतांश संस्थांकडून वर्तवण्यात आला आहे. मात्र, तामिळनाडूच्या राजकारणात भूकंप होण्याची शक्यता एका संस्थेच्या एक्झिट पोलनुसार वर्तवण्यात आली आहे. पहिल्यांदा विधानसभा निवडणूक लढवणाऱ्या अभिनेता विजय याच्या तमिलगा वेत्री कझगम या पक्षाला मोठं



यश मिळेल असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. एक्सिस माय इंडियाच्या एक्झिट पोलनुसार अभिनेता विजयचा टीव्हीके पक्ष 120 जागांवर विजय मिळवू शकतो. दुसऱ्या स्थानी द्रमुक आणि तिसऱ्या स्थानी अण्णाद्रमुक राहू शकते.

एक्सिस माय इंडियाच्या एक्झिट पोलनुसार टीव्हीके पक्षाला यावेळी 98 ते 120 जागांवर विजय मिळेल. तर, द्रुकला 92-110 जागांवर विजय मिळू शकतो. अण्णाद्रमुक पक्षाला 22-32 जागा मिळू शकतात. तामिळनाडूत सध्या द्रमुकचं सरकार असून काँग्रेसची त्यांच्यासोबत आघाडी आहे. तर, भाजप अण्णाद्रमुकचा मित्रपक्ष आहे. एक्सिस माय इंडियाच्या एक्झिट पोलचे अंदाज खरे ठरलं तर अभिनेता विजय राजकारणात मोठा चमत्कार करण्यात यशस्वी ठरेल. विजय यानं दोन वर्षांपूर्वी पक्ष स्थापन केला होता आणि त्याच्या पक्षानं पहिल्यांदा विधानसभा निवडणूक लढवली आहे. विजयच्या प्रचाराच्या सभांना मोठी गर्दी होत होती. एक्सिस माय इंडियानं अभिनेता विजयचा पक्ष सर्वात मोठा पक्ष ठरण्याचा अंदाज वर्तवला असला तरी इतर संस्थांनी तामिळनाडूत द्रमुकची सत्ता येईल असा अंदाज वर्तवला आहे. मॅटराइज एक्झिट पोलनं द्रमुक आघाडीला 122-132 जागा, अण्णाद्रमुक आणि मित्रपत्रांना 87-100 जागा मिळतील असा अंदाज वर्तवलेला आहे. पी मार्कनं द्रमुक आघाडीला 125-145 जागा, अण्णाद्रमुक आघाडीला 65-85 जागा आणि टीव्हीकेला 16-26 जागांचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

पीपल्स पल्स नुसार तामिळनाडूत द्रमुकची पुन्हा सत्ता येऊ शकते. द्रमुक आघाडीला 125-145 जागांवर विजय मिळू शकतो. अण्णा द्रमुक आघाडीला 65-80 जागांवर विजय मिळू शकतो. तर टीव्हीकेला 18-24 जागांवर विजय मिळू शकतो. प्रजा पोल्सनुसार द्रमुक आघाडीला 148-168 जागांवर विजय मिळेल. तर, अण्णाद्रमुकला 61-81 जागा मिळू शकतात. अभिनेता विजयच्या पक्षाला 9 जागांवर विजय मिळू शकतो. पीपल्स इनसाईनुसार अभिनेता विजयचा पक्ष 30 ते 40 जागा जिंकू शकतो. तर, द्रमुकला 120 ते 140 जागांवर विजय मिळू शकतो. तर, अण्णाद्रमुकला 60-70 जागांवर विजय मिळण्याचा अंदाज आहे.

# वादळी वाऱ्यासह पावसामुळं भिंत कोसळून अपघात

## बंगळुरुमध्ये सात जणांचा मृत्यू तर अनेकजण जखमी

कर्नाटक : (स. गांवकरी)

कर्नाटकातील बंगळुरुमध्ये धक्कादायक घटना घडली आहे. आज सायंकाळी शिवाजीनगर येथील 'बोरिंग आणि लेडी कर्झन रुग्णालया'ची संरक्षक भिंत कोसळली आहे. यामध्ये सहा वर्षांच्या एका मुलीसह सात जणांचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. तर अन्य सात जण जखमी झाले आहेत. मुसळधार पाऊस आणि अनेक दशके जुन्या असलेल्या या भींतीवर बांधकामाचा अतिरिक्त भार पडल्यामुळे ही दुर्घटना घडल्याचे मानले जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सुमारे 12 फूट उंच आणि एक फूट जाड असलेली भिंत सायंकाळी 5.45च्या सुमारास कोसळली. ज्यामुळे 10 ते 12 अधिक लोक अडकून पडले. त्यापैकी काही जण पदपथावर आपली दुकाने मांडणारे विक्रेते होते, तर काही खरेदीदार किंवा पावसापासून आश्रय घेतलेले वाटसरू होते. बचाव पथक घटनास्थळी पोहोचण्यापूर्वीच, स्थानिक रहिवाशांनी पीडितांना जवळच्या रुग्णालयात दाखल केले, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली आहे.

पोलीस उपायुक्त (पूर्व) विक्रम अमाथे यांनी सांगितले की, मृतांमध्ये दोन महिला, चार पुरुष आणि एका मुलीचा समावेश आहे. जखमी झालेल्या सात जणांपैकी तिघे मूळचे केरळचे रहिवासी असून ते बंगळुरूला भेट देण्यासाठी आले होते, असेही त्यांनी नमूद केले. मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी रुग्णालयात जाऊन पीडितांची विचारपूस केली आणि प्रत्येक मृताच्या नातेवाईकांना 5 लाख रुपयांची मदत जाहीर केली. निष्काळजीपणाबद्दल रुग्णालयाचे कर्मचारी आणि 'ग्रेटर बंगळुरू ऑथॉरिटी' (GBA) च्या अधिकाऱ्यांना धारेवर धरले. या घटनेस कारणीभूत ठरलेल्या परिस्थितीबाबत सविस्तर चौकशी अहवाल सादर करण्याचे, जबाबदारी निश्चित करण्याचे आणि निष्काळजी आढळणाऱ्यांवर योग्य ती कारवाई करण्याचे निर्देश त्यांनी GBA च्या अधिकाऱ्यांना दिले आहेत. बंगळुरूचे पोलीस आयुक्त सीमांत कुमार सिंह यांनी सांगितले की, घटनास्थळावरून सर्व ढिगारा हटवण्यात आला आहे. बचावकार्यास विलंब झाला; कारण आजूबाजूच्या परिसरात झाडे



पडल्यामुळे निर्माण झालेल्या वाहतूक कोंडीत अग्निशमन दलाच्या चार गाड्या अडकल्या होत्या, ज्यामुळे घटनेनंतरच्या सुरुवातीच्या अत्यंत महत्त्वाच्या काही मिनिटांत घटनास्थळी पोहोचण्यात अडथळा निर्माण झाला होता. इमारत कोसळल्यानंतर अवघ्या सात मिनिटांतच आपत्कालीन सेवांना मदतीसाठी तब्बल 27 फोन आले, ज्यावरून तिथे निर्माण झालेल्या घबराटीच्या तीव्रतेचा अंदाज येतो. बचावकार्यादरम्यान पुढील धोके टाळण्याच्या उद्देशाने, खबरदारीचा उपाय म्हणून 'बंगळुरू वीज पुरवठा कंपनी'ने त्या परिसरातील वीजपुरवठा खंडित केला. या भागात सायंकाळी 5 वाजण्याच्या सुमारास पावसाला सुरुवात झाली आणि त्यासोबतच मेघगर्जनेसह वादळही आले. सायंकाळी 5.45 च्या सुमारास ती भिंत अचानक कोसळली.

# भोंदूबाबाचा कारनामा : पाडतो पैशाचा पाऊस

## आमिष दाखवत ५ जणांना १ कोटीला गंडा

पारनेर (स. गांवकरी)

पारनेर तालुक्यातील निघोज येथे अंधश्रद्धा आणि झटपट श्रीमंतीच्या आमिषाला बळी पडून पाच जणांची तब्बल १ कोटी रुपयांची फसवणूक झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे.



शिरूर येथे वास्तव्यास असल्याचे सांगणाऱ्या एका भोंदूबाबाने पैशांची पूजा केल्यास १० पट परतावा मिळेल, असे आमिष दाखवून संबंधितांना जाळ्यात ओढले. निघोजमधील एका व्यक्तीशी ओळख वाढवत भोंदूबाबाने आपल्याकडे अलौकिक शक्ती असल्याचा दावा केला. बनावट भक्तांच्या माध्यमातून विश्वास संपादन करून त्याने संबंधित व्यक्तीला तसेच इतर चार जणांना पैशांच्या पावसाचे स्वप्न दाखवले. त्यानंतर पाचही जणांनी जमीन गहाण ठेवणे, दागिने तारण ठेवणे तसेच सावकारांकडून कर्ज घेऊन एकूण १ कोटी रुपयांची रक्कम उभी केली. दरम्यान, ठरलेल्या दिवशी रात्रीच्या वेळी पूजा आयोजित करण्यात आली. पूजेदरम्यान भोंदूबाबाने सर्वांना मौन पाळण्यास सांगून 'तीर्थ' दिले. हे तीर्थ घेतल्यानंतर काही वेळातच सर्वजण बेशुद्ध झाल्याचे सांगण्यात येत आहे. शुद्धीवर आल्यानंतर भोंदूबाबा आणि पैशांची रक्कम दोन्ही गायब झाल्याचे लक्षात आले. फसवणूक झाल्यानंतर संबंधितांनी शिरूर तसेच गुजरातपर्यंत भोंदूबाबाचा शोध घेतला, मात्र त्याचा कोणताही ठावठिकाणा लागला नाही. या घटनेबाबत गावात दबया आवाजात चर्चा सुरू असली तरी अद्याप पोलीस ठाण्यात अधिकृत तक्रार दाखल झालेली नाही. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून अंधश्रद्धा व भोंदूगिरीविरोधात कठोर कारवाईची मागणी नागरिकांकडून होत आहे. नागरिकांनी अशा आमिषांना बळी न पडता सजग राहण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

## थोडक्यात...

### सोनसाखळी लुटणारे पाच जण अटकेत

पुणे (स. गांवकरी) : विवाह समारंभातील मेंदीच्या कार्यक्रमात एका टोळक्याने शस्त्राचा धाक दाखवून पाच लाख रुपये किमतीची सोनसाखळी हिसकावून नेल्याची घटना फुगेवाडी परिसरात घडली. याप्रकरणी लक्ष्मीनगर पोलिसांनी दरोड्याचा गुन्हा दाखल करून पाचही आरोपींना अटक केली. याप्रकरणी नंदू अर्जुन काची (वय ५३, रा. फुगेवाडी, पिंपरी-चिंचवड) यांनी लक्ष्मीनगर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.संतोष दशरथ काची, यश संतोष काची (दोघे रा. ममतानगर, सांगवी, पिंपरी-चिंचवड), दत्ता रघुनाथ चव्हाण (रा. वारजे), सुशील सूर्यकांत गौड (रा. पाटील इस्टेट, जुना मुंबई-पुणे रस्ता) आणि यश दीपक सावंत (रा. जुनी सांगवी, पिंपरी-चिंचवड) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सुनीता काची यांच्या घरी २७ एप्रिल रोजी रात्री मेंदीचा कार्यक्रम सुरू होता. आरोपींनी फिर्यादी नंदू काची यांना शस्त्राचा धाक दाखवत त्यांची पाच लाख रुपयांची सोनसाखळी हिसकावून घेतली. आरोपींनी त्यांना मारहाण करून तेथून पोबारा केला. पुढील तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक मिथुन सावंत करत आहेत.

### मिळकतकर चुकविणारे रडारवर

पुणे (स. गांवकरी) : मिळकतकर थकविणारे, चुकविणारे व अनधिकृत बांधकामे करणारे आता महापालिकेच्या रडारवर असणार आहेत. त्यांच्यावर आता कडक कारवाई केली जाणार आहे. कराच्या जाळ्याबाहेर असणाऱ्यांविरुद्धदेखील कारवाईचा बडगा उगारला जाणार आहे. थकबाकी असणाऱ्या सुमारे ४०० ते ५०० मिळकतींना जप्तीच्या कारवाईला सामोरे जावे लागण्याची शक्यता आहे. मिळकतकराची देयके प्राप्त झाल्यानंतर तातडीने बिल भरणाऱ्यांना पाच ते दहा टक्क्यांची सवलत महापालिका देते. त्यानंतरही मिळकतकर भरण्याकडे नागरिकांकडून दुर्लक्ष केले जाते. या पार्श्वभूमीवर, मिळकतकर आकारणी विभागाकडून यंदा उत्पन्न वाढविण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. त्यासाठी मिळकतीच्या वापरातील बदल, अनधिकृत बांधकामे यांचा सखोल तपास करून करचुकवेगिरी करणाऱ्यांविरुद्ध कठोर पावले उचलली जाणार आहेत. जप्ती मोहिमेवर यंदा अधिक भर दिला जाणार आहे. २०२५-२६ या आर्थिक वर्षात २५० मिळकती जप्त केल्या असून, संबंधित मिळकतींचा लिलाव पुढील महिन्यात होणार आहे.

### पती-पत्नीची रस्त्यावर हाणामारी

शिरूर (स. गांवकरी) :कोर्टातील पोटगीच्या दाव्यावरून पती - पत्नीमध्ये वाद झाला. वादाचे पर्यावसान हाणामारीत झाले असून, एकमेकांविरोधात तक्रारी दिल्याने शिरूर पोलिसांनी दोघांसह दोन अनोळखी तरूणांविरूद्ध आज गुन्हे दाखल केले. मंगळवारी (ता. २८) दुपारी अडीच वाजता हा प्रकार घडला. चित्रा विक्रम टोणगे (वय ३२, रा. फाकटे, ता. शिरूर, जि. पुणे) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून विक्रम वाल्मिक टोणगे (वय ३६, रा. कोहकडी, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर) याच्याविरूद्ध तर विक्रम याने दिलेल्या फिर्यादीवरून दोन अनोळखी तरूणांविरूद्ध गुन्हा दाखल केला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनूसार, कोहकडी येथील दांपत्याचा शिरूर न्यायालयात पोटगीचा दावा दाखल होता. न्यायालयातील कामकाज आटोपल्यावर घरी जात असताना रामलिंग रस्ता परिसरात पोटगीच्या विषयावर चर्चा करण्याच्या निमीत्ताने थांबले असताना त्यांच्यात वाद झाले. न्यायालयात पोटगीचा अर्ज करून पोटगीची मागणी केल्याच्या कारणावरून चिडून पतीने शिवीगाळ, दमदाटी केली.









# थोडक्यात पण महत्वाचे



## मे. पडतानी उद्योग समूहास डॉ. विश्वासराव आरोटे यांची सदिच्छा भेट

■ श्रीगोपालशेठ पडतानी यांचा वतीने पुस्तक देऊन सत्कार!

अहिल्यानगर (स. गांवकरी) : अहिल्यानगर जिल्ह्यातील संगमनेर तालुक्यातील मे. पडतानी उद्योग समूहाच्या कार्यालयात महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांनी सदिच्छा भेट दिली. यावेळी संगमनेर मर्चंट को-ऑपरेटिव्ह बँकेचे माजी अध्यक्ष तथा विद्यमान संचालक श्रीगोपालशेठ पडतानी यांनी डॉ. आरोटे यांचा पुस्तक देऊन सत्कार केला. या भेटीदरम्यान विविध सामाजिक, शैक्षणिक व उद्योग क्षेत्रातील विषयांवर सकारात्मक चर्चा झाली. उपस्थितांनी या सदिच्छा भेटीचे स्वागत करत परस्पर सहकार्याची भावना व्यक्त केली.

## माती वाहतूक करणारा हायवा कोसळला थेट घरावर



नारायणगाव (स. गांवकरी) : जुन्नर तालुक्यात बेकायदेशीर माती वाहतूक सुरु असून माती वाहतूक करणारा हायवा थेट घरावर कोसळला चालकाचे स्टेरींग वरील ताबा सुटल्याने माती वाहून नेणारा हायवा क्रमांक एम एच 14 JG1552 थेट एका घराच्या भिंतीला घुसून पलटी झाला!बाजूलाच एक लहान मुलगा खेळत होता. मात्र आवाजाने तो घाबरला आणि तेथून रडतरडतच पळाला. चालक दारू पिऊन तर्र होता. अपघाता नंतर त्याने बाहेर येऊन बाजूला बसला त्याला व्यवस्थित बोलताही येत नव्हते!ही घटना माणकेश्वर ता. जुन्नर येथे घडली. माती वाहतूक करणारी वाहने माती, मुरूम वाहने बेकायदेशीर वाहतूक करीत असून याकडे महसूल विभागाचे सपशेल दुर्लक्ष दिसून येत आहे. RTO विभागाचेही मुरूम आणि माती वाहतूक करणाऱ्या वाहनांवर लक्ष नसल्याची बाब समोर आली आहे. हायवा घरात पलटी झाला तेव्हा चालक मद्यधुंद अवस्थेत होता. गाडी पलटी झाल्यानंतर तो बाजूलाच बसून आहे. दरम्यान दोन दिवसांपूर्वी मद्यधुंद अवस्थेतील महसूल अधिकाऱ्यांनी उभ्या हायवा गाडीवर जाऊन धडकले? ही बाब माध्यमांनी महसूल विभागाच्या निदर्शनास आणून दिली असल्याची माहिती सूत्रांनी दिली. बेकायदेशीर माती वाहतूक करणाऱ्या वाहनांमुळे राहादारी करणाऱ्यांना प्रचंड त्रास होतो मात्र माती उत्खनन करणाऱ्यांना महसूलचा आशीर्वाद आहे का? असा प्रश्न सामान्य माणसांना पडला आहे.



## दाक्षिणात्य सुपरस्टार विजय थालापती यांनी घेतले साईसमाधीचे दर्शन

शिर्डी (स. गांवकरी) : प्रसिद्ध दाक्षिणात्य सिनेअभिनेता विजय थालापती यांनी बुधवार, २९ एप्रिल २०२६ रोजी शिर्डी येथे श्री साईबाबांच्या समाधीचे दर्शन घेतले. शिर्डी येथील श्री साईबाबा संस्थान मंदिरात त्यांनी पारंपरिक पद्धतीने समाधीचे दर्शन घेऊन आशीर्वाद घेतला. त्यांच्या या भेटीची साईभक्तांसह चित्रपट आणि राजकीय वर्तुळात मोठी चर्चा रंगली आहे. दर्शनानंतर श्री साईबाबा संस्थानच्या वतीने मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी विजय यांचा सत्कार केला. यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी भीमराज दराडे, मंदिर प्रमुख विष्णु थोरात तसेच जनसंपर्क अधिकारी दिपक लोखंडे उपस्थित होते. तमिळ चित्रपटसृष्टीतील अत्यंत लोकप्रिय अभिनेता म्हणून ओळख असलेल्या विजय यांनी अलीकडेच राजकारणातही सक्रिय प्रवेश केला आहे. निवडणुकीच्या निकालापूर्वी आशीर्वाद घेण्यासाठी त्यांनी शिर्डीला भेट दिल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.



## आमदार डॉ. किरण लहामटे यांचे ग्रामस्थांकडून आभार!

अकोले (स. गांवकरी) : वीरगाव येथील सुमारे ६० ते ७० वर्षे जुने दगडी बांधकाम असलेले ऐतिहासिक समाजमंदिर अलीकडेच आगीच्या भक्ष्यस्थानी पडल्याने गावाच्या वैभवाची मोठी हानी झाली. सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक दृष्ट्या महत्त्वपूर्ण असलेल्या या वास्तूचा उपयोग विविध समाजोपयोगी कार्यक्रमांसाठी होत होता. गेल्या वीस वर्षांपासून स्वामी विवेकानंद विद्यालयाचा विद्यार्थी वर्गही याच ठिकाणी भरत होता. या दुर्दैवी घटनेची माहिती मिळताच अकोले मतदारसंघाचे आमदार डॉ. किरण लहामटे यांनी तातडीने घटनास्थळी भेट देऊन नुकसानीची पाहणी केली. यावेळी त्यांनी समाजमंदिराच्या पुनर्बांधणीसाठी तातडीने निधी उपलब्ध करून देण्याचा शब्द ग्रामस्थांना दिला. या आश्वासनामुळे वीरगावकरांना मोठा दिलासा मिळाला असून, गावाच्या वैभवाचे प्रतीक असलेली ही वास्तू पुन्हा उभी राहणार असल्याची आशा निर्माण झाली आहे. समस्त वीरगावकरांच्या वतीने आमदार डॉ. किरण लहामटे यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले.

# सह्याद्री अतिथीगृह येथे राज्यस्तरीय सोहळा

### जिल्हा परिषद ठाणेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांचा विशेष सन्मान




ठाणे : (स. गांवकरी)

"द्वितीय सेवा हक्क दिन" निमित्त आज, दि. २८ एप्रिल, २०२६ रोजी सह्याद्री अतिथीगृह, मुंबई येथे राज्यस्तरीय सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास मा. मुख्य आयुक्त, महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग यांच्या अध्यक्षतेखाली तसेच मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्या प्रमुख उपस्थितीत मान्यवरांची उपस्थिती लाभली.

या सोहळ्यात जिल्हा परिषद ठाणेचे तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांचा "आदर्श आपले सरकार सेवा केंद्र" या नावीन्यपूर्ण उपक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीबद्दल विशेष सन्मान करण्यात आला. महाराष्ट्र राज्य सेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत नागरिकांना वेळेत व पारदर्शक सेवा मिळाव्यात यासाठी त्यांनी केलेल्या कार्याची दखल घेऊन हा गौरव प्रदान करण्यात आला. या उपक्रमाद्वारे जिल्हा परिषद ठाणेने सेवा वितरण प्रक्रियेत गती, पारदर्शकता आणि सुलभता आणत नागरिकांना अधिक कार्यक्षम सेवा उपलब्ध करून दिल्या आहेत. "आदर्श आपले सरकार सेवा केंद्र" या संकल्पनेमुळे नागरिकांना शासकीय सेवा एकाच ठिकाणी, वेळेत आणि सोप्या पद्धतीने मिळू लागल्या असून, हा उपक्रम राज्यातील इतर जिल्ह्यांसाठीही प्रेरणादायी ठरला आहे.

यावेळी मान्यवरांनी आपल्या मनोगतात राज्यातील सर्व शासकीय यंत्रणांनी सेवा हक्क अधिनियमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यावर भर द्यावा, असे सांगितले. तसेच नागरिककेंद्री प्रशासन उभारण्यासाठी अशा नावीन्यपूर्ण उपक्रमांची गरज अधोरेखित करण्यात आली.

कार्यक्रमात विविध जिल्ह्यांतील अधिकारी, कर्मचारी तसेच सेवा हक्क अधिनियमाच्या अंमलबजावणीत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान करण्यात आला.

महाराष्ट्र शासनाने नागरिकांना पारदर्शक, सुलभ आणि वेळेत शासकीय सेवा मिळाव्यात यासाठी महाराष्ट्र लोकसेवा हक्क (RTS) अधिनियम, २०१५ लागू केला आहे. या कायद्यामुळे नागरिकांना निश्चित कालमर्यादित सेवा मिळण्याचा कायदेशीर अधिकार प्राप्त झाला आहे. या कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी 'आपले सरकार सेवा केंद्र' महत्त्वाची भूमिका बजावत असून जिल्ह्यातील सर्व ४३१ ग्रामपंचायतींना 'आपले सरकार सेवा केंद्र'शी जोडण्यात आले असून त्यापैकी ३०७ केंद्रे चालक पद मंजूर आहेत. या माध्यमातून १००० पेक्षा अधिक शासकीय सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध होत आहेत. याशिवाय 'Thane Doorstep Delivery' या उपक्रमांतर्गत सुमारे ४०० हून अधिक सेवा नागरिकांना घरपोच देण्यात येत असून आतापर्यंत ५५१२ पेक्षा अधिक सेवा वितरित करण्यात आल्या आहेत. या उपक्रमांमुळे नागरिकांचा वेळ व खर्च वाचत असून सेवा वितरणात पारदर्शकता वाढली आहे. विशेषतः ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग आणि दुर्गम भागातील नागरिकांना याचा मोठा लाभ होत आहे. या सन्मानामुळे जिल्हा परिषद ठाणेच्या कार्याला राज्यस्तरावर मान्यता मिळाली असून, पुढील काळातही नागरिकाभिमुख सेवा देण्यासाठी प्रशासन अधिक जोमाने कार्यरत राहील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

## निर्भीड पत्रकार अमोल मतकर यांचा पत्रकार संघातर्फे गौरव!

संगमनेर : (स. गांवकरी)

वडगावपान येथील भोंदूगिरीचा पर्दाफाश करुन समाजात जागृती निर्माण करणारे पत्रकार अमोल मतकर यांचा संगमनेर श्रमिक पत्रकार संघाच्यावतीने विशेष गौरव करण्यात आला. यावेळी ज्येष्ठ पत्रकार सुनील नवले यांच्या हस्ते मतकर यांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संघाचे अध्यक्ष संजय आहिरे होते. मतकर यांनी गेल्या अनेक वर्षांपासून चालणाऱ्या या भोंदूगिरीविरुद्ध जो लढा दिला, तो पत्रकारितेची मूल्ये उंचावणारा असल्याचे गौरवोद्गार नवले यांनी काढले. यावेळी मतकर यांचे सहकारी सचिन जंत्रे यांच्याही कामाचे कौतुक करण्यात आले. याच सोहळ्यात केंद्र सरकारच्या 'बेटी बचाओ-बेटी पढाओ' या संकल्पनेवर आधारित राष्ट्रीय चित्रकला स्पर्धेत यश मिळवल्याबद्दल पत्रकार आणि चित्रकार आनंद गायकवाड यांचाही ज्येष्ठ पत्रकार श्याम तिवारी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.



याप्रसंगी उपाध्यक्ष नीलिमा घाडगे, सचिव शेखर पानसरे, सदस्य गोरक्षनाथ मदने, सोमनाथ काळे, सुनील महाले, भारत रेघाटे, बाबासाहेब कडून, मंगेश सालपे, संदीप वाकचौरे व काशिनाथ गोसावी आदी पत्रकार उपस्थित होते. प्रास्ताविक शेखर पानसरे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार नीलिमा घाडगे यांनी मानले.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

भिवंडी : (स. गांवकरी)

बापगाव येथील सिद्धिविनायक संकुलाच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती मोठ्या उत्साहात आणि दिमाखात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमात विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभली आणि सामाजिक, शैक्षणिक तसेच वैचारिक वातावरणात जयंती सोहळा पार पडला.




या प्रसंगी नांदकर येथील माजी उपसरपंच राजेंद्र गायकवाड, माजी उपसरपंच उषा कदम, सामाजिक कार्यकर्ते सुभाष जाधव, प्रताप बोदडे, जीवनदास गायकवाड, किशोर गायकवाड, कल्पेश गायकवाड आदी प्रमुख मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमात पालीभाषेचे अभ्यासक सुभाष जाधव यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनातील विविध टप्प्यांवर सखोल मार्गदर्शन केले. त्यांनी 'भिवा', 'भिमराव', 'डॉ. आंबेडकर', 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर' आणि 'बोधिसत्त्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर' या पाच टप्प्यांद्वारे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रवास उलगडून सांगितला. तसेच त्यांनी संविधानातील स्त्रियांसाठी असलेली कलमे १४, १५(१), १५(२), १६(१), ३९ तसेच हिंदू कोड बिल आणि रमाई यांच्या योगदानावरही प्रकाश टाकला.

यावेळी धर्मेंद्र वाल्मिकी यांच्या हस्ते प्रमुख पाहुण्यांना 'मुक्ती कोण पथे' हे पुस्तक भेट देण्यात आले. तसेच एस.एस. बेकर्सचे डायरेक्टर महेश केणे यांच्या वतीने केक वाटप करून आनंदोत्सव साजरा करण्यात आला. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी वक्तृत्व आणि नृत्य स्पर्धांमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. सहभागी विद्यार्थ्यांना बापगाव सावित्रीबाई फुले बचत गटाच्या अध्यक्षा स्वाती रुपेश जाधव यांच्या हस्ते शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रूपेश जाधव यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राहुल रंधवे, रुपेश जाधव, योगेश सूर्यवंशी, स्वप्नील साबळे, दौलत धनगर, दीपक माघाडे, आकाश मोरे, दिनेश ताम्हणकर, मनोज खिल्लारी, रवि जाधव, धर्मेंद्र वाल्मिकी, बळीराम कुटे, प्रवीण वामनाचार्य, शाहीर काळे आणि वाल्मीक धीवर यांनी विशेष परिश्रम घेतले.

या जयंती सोहळ्याद्वारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे स्मरण करून सामाजिक समता, शिक्षण आणि प्रगतीचा संदेश प्रभावीपणे देण्यात आला.

## जिल्हाधिकारी कार्यालय येथे 'सेवा हक्क दिन' उत्साहात साजरा

### उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या ग्रामपंचायतींचा गौरव; "आपली सेवा, आमचे कर्तव्य" शपथ

ठाणे : (स. गांवकरी)



महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अन्वये २८ एप्रिल हा दिवस 'सेवा हक्क दिन' म्हणून साजरा केला जातो. या निमित्ताने सेवा हमी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करणाऱ्या ग्रामपंचायतींचा विशेष गौरव करण्यात आला. यामध्ये भिवंडी तालुक्यातील ग्रामपंचायत अंजूर व ग्रामपंचायत सोनाळे तसेच शहापूर तालुक्यातील ग्रामपंचायत चेरपोली या ग्रामपंचायतींचा समावेश असून, संबंधित सरपंच, ग्रामपंचायत अधिकारी व केंद्रचालक यांना सन्मानित करण्यात आले. तसेच ग्रामपंचायत अधिकारी हिरामण खाडे यांचा उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमास जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ व अपर जिल्हाधिकारी हरिश्चंद्र पाटील यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) रूपाली भालके, उपजिल्हा निवडणूक अधिकारी वैशाली माने, उपजिल्हाधिकारी सर्जेराव मस्के-पाटील, शशिकांत गायकवाड, वरुणकुमार सहारे, प्रांताधिकारी उर्मिला पाटील, प्रांताधिकारी अमित सानप, उप मुख्य कार्यकारी अधिकारी प्रमोद काळे, तहसीलदार सचिन चौधरी, संदीप थोरात तसेच विविध विभागांतील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी "आपली सेवा, आमचे कर्तव्य" ही शपथ घेत नागरिकांना वेळेत, पारदर्शक आणि गुणवत्तापूर्ण सेवा देण्याचा संकल्प व्यक्त केला. कार्यक्रमास उपस्थित मान्यवरांनी सेवा हक्क अधिनियमाच्या प्रभावी अंमलबजावणीवर भर देत नागरिककेंद्री प्रशासन उभारण्यासाठी सर्व यंत्रणांनी अधिक संवेदनशीलतेने कार्य करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी केले. तसेच 'आदर्श आपले सरकार सेवा केंद्र' सारख्या उपक्रमांमुळे नागरिकांना सुलभ व जलद सेवा उपलब्ध होत असल्याचे नमूद करण्यात आले. 'सेवा हक्क दिना'च्या निमित्ताने जिल्हा प्रशासनाकडून नागरिकांना दर्जेदार सेवा देण्यासाठी वचनबद्धता पुन्हा अधोरेखित करण्यात आली असून, पुढील काळातही सेवा वितरणात पारदर्शकता, कार्यक्षमता आणि उत्तरदायित्व वाढविण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली.

या कार्यक्रमामुळे सेवा हक्क अधिनियमाबाबत जनजागृती होऊन प्रशासन व नागरिक यांच्यातील विश्वास अधिक दृढ होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

## तांत्रिक ॲप्रेंटिस कंत्राटी कामगार असोसिएशनची कार्यकारिणी जाहीर

नागपूर : (स. गांवकरी)

■ तांत्रिक कामगारांच्या हक्कांसाठी संघटना अधिक बळकट होणार

तांत्रिक कामगार युनियन प्रणित तांत्रिक ॲप्रेंटिस कंत्राटी कामगार असोसिएशनची राज्य कार्यकारिणी नुकतीच जाहीर करण्यात आली असून, यामध्ये राज्यभरातील विविध जिल्ह्यांतील पदाधिकाऱ्यांचा समावेश करण्यात आला आहे. या कार्यकारिणीत राज्याध्यक्षपदी प्रभाकर लहाने (वाशिम) यांची निवड करण्यात आली आहे. राज्य कार्याध्यक्षपदी विक्की कावळे (नागपूर) यांची नियुक्ती करण्यात आली असून, सरचिटणीसपदी प्रदीप पाटील (जळगाव) यांची निवड झाली आहे. तसेच राज्य उपाध्यक्ष म्हणून नितिन भैय्या चव्हाण (सोलापूर), राहिल शेख (वाशिम) आणि धिरज घायवट (अमरावती) यांची निवड करण्यात आली आहे. उप सरचिटणीसपदी अतुल पाटील (वाशिम) व दत्तात्रय रायकर (पुणे) यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

राज्य सचिव म्हणून विक्रम वाघचौरे (अहमदनगर) व अजित दजगुडे (पुणे) व राज्य संघटक प्रताप खंदारे (सोलापूर )यांची निवड झाली असून, कोषाध्यक्षपदी राम पाटील (वाशिम) यांची जबाबदारी देण्यात आली आहे. नवीन कार्यकारिणीच्या माध्यमातून तांत्रिक ॲप्रेंटिस व कंत्राटी कामगारांच्या समस्या सोडवण्यासाठी तसेच त्यांच्या हक्कांसाठी लढा अधिक तीव्र करण्यात येणार असल्याचे संघटनेच्या वतीने सांगण्यात आले. तसेच राज्यातील कामगारांना संघटनेच्या माध्यमातून न्याय मिळवून देण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला आहे.

# 1 हजार नंदी-गायींचा कॅम्पस करण्याचा मनोदय - डॉ. संजय मालपाणी

### ओम नंदीशाळेत गो-सेवा सत्संग उत्साहात

संगमनेर : (स. गांवकरी)

ओम नंदी शाळेत सध्या 33 नंदी व गाय आहेत. यात लवकरच 20 नंदीची वाढ होणार असल्याचे स्पष्ट करत भविष्यात हा कॅम्पस एकुण 1 हजार नंदी व गायांचा करण्याचा मनोदय असल्याचे गोरक्षण संस्थेचे अध्यक्ष उद्योजक डॉ. संजय मालपाणी यांनी सांगितले.

संगमनेर येथील युवा महेश व साई प्रेरणा सत्संग मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने ओम नंदी शाळा, ध्रुव ग्लोबल स्कुल, धांदरफळ-संगमनेर येथे "गोपुजन-गोग्रास-संकीर्तन" च्या माध्यमातुन आयोजीत "गो सेवा सत्संग" सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते. तर माहेश्वरी पंच ट्रस्ट चे सरपंच विश्वनाथ कलंत्री यांची कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती होती. या सोहळ्यास मालपाणी उद्योग समूहाचे विशेष सहकार्य लाभले. मान्यवरांचा सत्कार युवा महेश चे अध्यक्ष विनय तापडीया व साई प्रेरणा सत्संग मंडळाचे अध्यक्ष हरिष सारडा यांनी केला.





डॉ. मालपाणी पुढे म्हणाले कि, गो-शाळेत वाढदिवस साजरे करण्याचे विशेष महत्व आहे. म्हणून ओम नंदी शाळेत देखील अनेक नागरिक वाढदिवस साजरे करण्यासाठी येथे येतात. पंडीतजी भारत व्यास हे वाढदिवस असणाऱ्या व्यक्तींकडून हवन करवुन घेतात. ह्या हवनाचा शारीरीक व मानसिक लाभ होतो, मुलांवर संस्कार होतात, यासाठी गो-शाळेत वाढदिवस साजरे करा असे आवाहन देखील त्यांनी केले. तर ध्रुव अकॅडमीच्या वाणिज्य शाखेकडून गो-सेवा केली जात असल्याचेही ते म्हणाले. सरपंच विश्वनाथ कलंत्री यांनी गो-शाळेतील उत्कृष्ट व्यवस्थापनाबद्दल मालपाणी परिवाराचे व गो-शाळेत आयोजीत केलेल्या सत्संग सोहळ्याचे विशेष कौतुक केले. यावेळी सरपंच विश्वनाथ कलंत्री, प्रा. गोपाल कलंत्री व कु. विश्वा लाहोटी यांच्या वाढदिवसानिमीत्त त्यांच्या हस्ते हवन करण्यात आले.

यावेळी उपस्थित मान्यवर, युवा महेश, साई प्रेरणा सत्संग मंडळाच्या सदस्यांच्या हस्ते गो-ग्रास दिला गेला. युवा महेश, साई सत्संग मंडळ, सरपंच विश्वनाथ कलंत्री यांनी ओम नंदी शाळेस देणगी दिली. याप्रसंगी प्रदेश जनसंपर्क मंत्री अजय जाजू, युवा महेश चे संस्थापक अध्यक्ष प्रकाश कलंत्री, गो-शाळेचे ट्रस्टी राधेश्याम राठी, प्रितम मुंदडा, बाबासाहेब गोर्डे, कमल आसावा, मिलींद दहाड, दत्ता निचळ, प्रशांत कासट, जगदिश उपाध्ये, मनोज मंत्री, डॉ. रविन चांडक, हरिष चांडक आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# थोडक्यात पण महत्वाचे

## सातवाहन काळातील हत्ती छाप नाणी




जुन्नर (स. गांवकरी) : दोन हजार दोनशे वर्षांपूर्वी च्या सातवाहन काळातील काही पोटीन नाण्याच्या दर्शनीभागावर प्रामुख्याने एका डौलदार हत्तीचे चित्र कोरलेले पाहायला मिळते. हा हत्ती कधी उजवीकडे तर कधी डावीकडे तोंड करून उभा असलेला किंवा चालत असलेला दाखविलेला पाहायला मिळतो. काही नाण्यावर या हत्तीची सोंड उंचवलेली आहे तर काही नाण्या वरती अत्यंत शांतपणे सोंड खाली सोडलेली दिसून येते. हत्ती हे प्राचीन भारतीय संस्कृतीतील राजेशाहीचे, सामर्थ्याचे आणि संस्कृतीचे सर्वोच्च प्रतीक मानले गेले आहे. त्यामुळे सातवाहन घराण्यातील काही राज्यानी आपल्या नाण्या वर हत्तीला दिलेले हे प्राधान्य त्याच्या सार्वभौम सत्तेचे अफाट सामर्थ्याचे व राजेशाहीचे घोतक आहे.नाण्याच्या दर्शनी भागावरी ल हत्तीच्या पाठीवर किंवा नाण्याच्या वरच्या गोलाकार कडेला प्राचीन ब्राह्मी लिपीमध्ये आणि प्राकृत भाषेमध्ये नाणे पाडणाऱ्या राजाचे नाव अत्यंत सुबकपणे कोरलेले पाहायला मिळते. हत्ती छाप नाण्याच्या मागील भागावर सातवाहन घराण्याचे अत्यंत खास ओळख असलेले उज्जैन चिन्ह कोरलेले आढळते हे चिन्ह नेमके काय दर्शवते यावर आजही संशोधन सुरू आहे.तरी हे चिन्ह सातवाहनां च्या राजकीय वर्चस्वाचे त्याच्या राजमुद्रेचे किंवा त्याच्या एखाद्या मोठ्या विजयाचे प्रतीक असावे असे अनेक अभ्यासक सांगतात. सातवाहन काळातील हत्तीच्या छापाची काही नाणी एका विशिष्ट मिश्र धातूपासून बनवलेली होती.प्राचीन काळात तांबे,शिसे आणि कथील या धातूचे एका विशिष्ट व ठराविक प्रमाणात मिश्रण करून पोटीन हा अतिशय कठीण धातू तयार केला जात असे.पोटीन धातूचा मुबलक वापर हे तत्कालीन प्रगत धातुशास्त्राचे,रसायन शास्त्राचे आणि सातवाहन काळातील अत्यंत स्वतंत्र अशा अर्थव्यवस्थेचे एक उत्तम उदाहरण मानले जात असत . ज्या नाण्यांमध्ये शिसाचे प्रमाण अधिक होते ती नाणी शिशाच्या मूळ गुणधर्मामुळे काळीकुट्ट व मळकट रंगाची दिसून येतात. तर ज्या नाण्यांमध्ये तांब्याचे प्रमाण अधिक होते ती नाणी तांब्या सारखी लालसर आणि चकचकीत रंगाची दिसून येतात.

## राज्यात उष्णतेची लाट; नागरिकांनी अधिकृत सूचनांचे पालन करावे

अकोले (स. गांवकरी) : राज्यात वाढत्या तापमानाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी उष्णतेपासून बचावासाठी आवश्यक खबरदारी घ्यावी, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार राज्यातील काही भागांत तापमानात वाढ होण्याची शक्यता असून, दुपारच्या कडक उन्हात विशेष काळजी घेण्याचा सल्ला देण्यात आला आहे. प्रशासनाने नागरिकांना सकाळी ११ ते दुपारी ४ या वेळेत अनावश्यक बाहेर पडणे टाळावे, भरपूर पाणी व द्रवपदार्थ घ्यावेत, हलके व सैल कपडे परिधान करावेत तसेच लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि आजारी व्यक्तींनी विशेष काळजी घ्यावी, असे सांगितले आहे. उष्माघाताची लक्षणे जाणवल्यास तातडीने वैद्यकीय उपचार घ्यावेत, असेही आरोग्य विभागाने स्पष्ट केले आहे. शेतकरी, मजूर व उन्हात काम करणाऱ्या नागरिकांनी नियमित विश्रांती घ्यावी आणि डोके झाकून काम करावे, असा सल्ला देण्यात आला आहे. दरम्यान, सोशल मीडियावर उष्णतेबाबत विविध अप्रमाणित संदेश व्हायरल होत असल्याने नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता केवळ हवामान विभाग, आरोग्य विभाग व स्थानिक प्रशासनाच्या अधिकृत सूचनांवरच विश्वास ठेवावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. प्रशासनाने नागरिकांना शांत राहून आवश्यक ती काळजी घेण्याचे आणि उष्णतेच्या काळात स्वतःची व कुटुंबीयांची सुरक्षितता जपण्याचे आवाहन केले आहे.




## शनिवारी आशा भोसले यांना गीतांमधून अभिवादन

संगमनेर (स. गांवकरी) : स्वर सम्राज्ञी पद्मभूषण आशा भोसले यांचे नुकतेच निधन झाले असून त्यांना अभिवादन म्हणून सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात संगीत महाविद्यालयाच्या वतीने शनिवार दिनांक 2 मे 2026 रोजी सायंकाळी 6 ते 8 या वेळेत महाविद्यालयात एक शाम आशाताई के नाम या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती संचालक प्रा. विनोद राऊत यांनी दिली आहे. स्वर सम्राज्ञी आशा भोसले यांनी विविध भाषांमधून सुमारे 12000 गीते गायले आहेत. मराठीमधील लोकगीते, कोळीगीते ,याचबरोबर त्यांचे भजन आणि अभंगही अत्यंत प्रसिद्ध आहेत. मागील आठ दशके त्यांनी भारतीय रसिकांच्या मनावर राज्य केले असून आपल्या गायनातून जनतेची सेवा केली आहे. महाराष्ट्राचे वरिष्ठ नेते बाळासाहेब थोरात आणि पद्मश्री आशाताई भोसले यांचे स्नेहाचे संबंध राहिले त्यामुळे आशाताई ह्या संगमनेरला 2014 मध्ये कार्यक्रमासाठी आल्या होत्या याचवेळी सुधीर गाडगीळ यांनी त्यांची प्रकट मुलाखत घेतली होती. यानंतर ही संगमनेरच्या प्रत्येक कार्यक्रमात आशाताई भोसले यांनी आवर्जून लोकनेते बाळासाहेब थोरात यांना फोन करून संगमनेर मधील नागरिकांशी संवाद साधला होता. त्यांच्या निधनाने देशाच्या संगीत क्षेत्राचे मोठे नुकसान झाले असून आशाताईंना अभिवादन म्हणून सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात संगीत महाविद्यालयाच्या वतीने एक शाम आशाताई के नाम हा कार्यक्रम शनिवार दिनांक 2 मे 2026 रोजी सायंकाळी 6 ते 8 या वेळेस महाविद्यालयात होणार आहे. यावेळी लोकनेते बाळासाहेब थोरात ,माजी आ. डॉ.सुधीर तांबे, आमदार सत्यजित तांबे, पद्मश्री रघुवीर खेडकर, डॉ जयश्रीताई थोरात, सौ दुर्गाताई तांबे, डॉ मैथिलीताई तांबे यांच्यासह संगमनेर मधील विविध मान्यवर व संगीत प्रेमी उपस्थित राहणार आहेत. हा कार्यक्रम सर्वांसाठी मोफत व खुला असून संगमनेर मधील सर्व संगीत प्रेमी नागरिकांनी या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन जयहिंद लोक चळवळ, सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात महाविद्यालय, प्राचार्य डॉ बाळासाहेब वाघ व प्रा विनोद राऊत यांनी केले आहे

**Agasti Sahakari Sakhar Karkhana Ltd, Agastinagar**

Tal-Akole Dist - Ahilyanagar

ph (02424) 222775/297126 Email -agastisakhar@rediffmail.com

**TENDER NOTICE FOR SALE OF C-Heavy Molasses**

We are in Market to sale Following C-Heavy Molasses immediately as

| Sr. No. | Kind of Spirit | Quantity (Ltrs.) |
|---|---|---|
| 1 | C-Heavy Molasses of Season 2025-26 | 200 MT |

The purchasers are requested to send your highest quote rate by mail on or before dt 02/04/2026 at Karkhana site karkhana reserves right to accept / cancelled / reject any or all tenders without assigning any reason

(Sudhir Kapdnis) Managing Director — (Smt. Sunitatai Bhangare) Vice Chairman — (Sitaram Patil Gaikar) Chairman

# जुन्नरच्या पश्चिम उत्तरेकडील भागात भीषण पाणीटंचाई

- नागरिकांना पाण्यासाठी करावी लागतेय पायपीट
- पावसाचे पाणी साठवणुकीची अपुरी क्षमता



जुन्नर तालुका : (स. गांवकरी)

जुन्नर तालुक्याच्या पश्चिम उत्तरेकडील आदिवासी भागात जलस्रोतांमध्ये पाण्याची टंचाई निर्माण झाल्याने या भागातील आदिवासी जनतेला सालाबाद प्रमाणे मोठ्या प्रमाणात दुष्काळाचा सामना करावा लागत आहे. तालुक्याच्या पश्चिम उत्तरेकडे आदिवासी भागातील कोपरे,मांडवे,मुथाळणे,फोफसंडी जांभूळशी या परिसराला मुसळधार पावसाचे माहेरघर म्हणून ओळखले जाते. परंतु कित्येक कालावधीपासून या भागातील आदिवासी बांधवांना पिण्याच्या पाण्यासाठी उन्हाळ्यात पायपीट करावी लागत आहे.शासनाने नेहमी प्रमाणे एकच टँकर सुरू केला असून तोही वेळेवर जात नसल्याने अर्धी लोकसंख्या पाण्यावाचून रहाते आहे. पावसाळ्यात चार महिने मुसळधार पाऊस असून देखील उन्हाळ्यात जलस्रोतांमध्ये पाण्याचा थेंबही राहत नाही. अनेक पिढ्यांपासून या भागातील आदिवासी बांधवांना दुष्काळाचा सामना सहन करावा लागत आहे. मुख्यतः या भागातील विहिरी,शिवकालीन टाक्या,बुडीत व नादुरुस्त बंधारे, तळी या जलस्रोतांमध्ये पाऊस तुडुंब राहतो.परंतु उन्हाळ्यात त्यात पाण्याचा थेंब देखील राहत नाही. वर्षभरात मार्च, एप्रिल आणि मे या महिन्यात या भागातील आदिवासी बांधवांना पाण्याचा खूप त्रास सहनकरावा लागतो. तालुक्याच्या पश्चिम आणि आदिवासी भागातील गावांचा पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सुटावा याकरिता शासनाकडून शिवकालीन खडकातील टाक्या, बुडीत बंधारे,उपनलिका,पाझर तलाव असे जलस्रोत काढण्यात आले.परंतु या भागात पाण्याची टंचाई कमी करण्यासाठी कायम स्वरूपी जलस्रोत नाही जलस्रोत हे असुनही दुर्बल ठरत असल्या चे दिसून येते.या आदिवासी भागातील शिवकालीन टाक्या तील पाणी दूषित झाल्यामुळे लोकांना साथीच्या रोगांचा सामना करावा लागतो. हाकेच्या अंतरावर पिंपळगांव जोगा,येसन ठाव,चिल्हेवाडी हे तीन जलाशय म्हणजे धरणे देखील आहेत. परंतु आदिवासी जनतेला त्यांच्या हक्काचे पाणी मिळत नाही.जलस्रोत असून देखील आदिवासी जनतेला पाण्याचा सामना करावा लागतो. या भागात पावसाचे पाणी साठवणुकीची अपुरी क्षमता दिसून येते.ही क्षमता वाढवणे गरजेचे आहे.जलस्रोतांची देखभाल आणि दुरुस्ती देखील करणे गरजेचे आहे. दरम्यान, धरणातून थेट पाणीपुरवठा करावा,टँकरच्या संख्या किंवा फेऱ्यांमध्ये पारदर्शकता आणि वाढ करावी दीर्घकालीन जल व्यवस्थापन आणि योजना करण्याची नितांत गरज असल्याचे मत आदिवासी भागातील ग्रामस्थांनी व्यक्त केले दरम्यान मुथाळणे गाव,गावठाण वाडी,मारखुलवाडी, शिंदीफाटा, तळपेवस्ती,पुताचीवाडी,मांडवे,जोशीवाडी,जांभूळशी,माळीवाडी आणि परिसरात असणाऱ्या सर्व वाड्या वस्त्या,पाडे,चारमोरी कोपरे,आदी ठिकाणीग्रामस्थांना पाण्याच्या दुष्काळाचा सामना करावा लागत असल्याचे चित्र सध्या तरी आहे.

जुन्नर तालुक्याच्या उत्तरेकडील आदिवासी भागाला दरवर्षी पिण्याच्या पाण्याचा सातत्याने सामना करावा लागतो.ही बाब अत्यंत दुर्दैवी आहे.

खरे तर मांडवी नदीवरील धरण हे या भागातील लोकांचे हक्काचे धरण असून या धरणाचे पाणी आदिवासी बांधवांना मिळणे गरजेचे आहे. परंतु गेली कित्येक वर्षे आदिवासी बांधव मागणी करूनही त्यांना हक्काचे पाणी मिळत नाही. याशिवाय गेली सत्तर वर्षांपासून आदिवासी बांधव एम.आय.टँक ची मागणी करीत आहेत मात्र निवडणूक काळात मलमपट्टी करून पोकळ आश्वासनावर बोळविले जाते.

याबाबत शासन स्तरावर आमच्या जिल्हा परिषद सदस्य सोनाबाई दाभाडे यांच्या माध्यमातून आवाज उठवला जाईल,असे सरपंच रोहिणी, माळी,पोलीस पाटील,ज्ञानेश्वर कवटे,विठ्ठल कवटे,हौसाबाई काठे, ग्रामविकास मंडळ अध्यक्ष काशिनाथ माळवे,मांडवे गावचे उपसरपंच मच्छिंद्र तळपे,बबन तळपे यांनी सांगितले.

## सुवर्ण महोत्सवी स्नेह मेळावा ५१व्या वर्षांनी संपन्न

जुन्नर तालुका: (स. गांवकरी)

श्री ज्ञानेश्वर विद्यालय सावरगाव दहावी १९७४/७५च्या बॅचचा स्नेह मेळावा मातोश्री मंगल कार्यालय सावरगाव येथे संपन्न झाला.या स्नेह मेळाव्या च्या निमित्ताने बी.एस. लोखंडे आणि आर.के.लोखंडे यांची उपस्थिती लाभली आणि कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान बी. एस.लोखंडे यांनी भूषवले. कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलन आणि प्रतिमा पूजनाने संपन्न झाले तसेच काही मित्र मंडळी हयात नाही त्यांना दोन मिनिटे उभे राहून श्रद्धांजली वाहण्यात आली.

त्यानंतर मान्यवरांचा सन्मान करण्यात आला.त्यानंतर माजी विद्यार्थी यांचा देखील सन्मान करण्यात आला.जवळजवळ ५१ वर्षांनी सर्व मित्रमंडळी एकमेकांना भेटले,भेटल्यानंतर त्यांच्या चेहऱ्यावरती वेगळाच आनंद दिसत होता.५१ वर्षांनी भेटलेले मित्रमंडळी एकमेकांना ओळखत सुद्धा नव्हते नाव सांगितल्यानंतर आश्चर्यचकित होऊन एकमेकांकडे पाहत होते. या सर्व विद्यार्थ्यांचे वय ६५ ते७० च्या दरम्यान झाले होते परंतु माझा मित्र ५१ वर्षांनी मला भेटला आणि हृदयामध्ये एक आपुलकी आणि प्रेम निर्माण झाले. प्रत्येकाने आपल्या मनोगतातून आपली येथे माहिती दिली शून्यातून विश्व निर्माण करावं यासारख्या मित्रांनी खूप अपार कष्ट करून कोणी व्यवसायच्या माध्यमातून तर कोणी नोकरीच्या तर कोणी शेतीच्या माध्यमातून आपला संसार व्यवस्थितपणे चालवला. अध्यक्षीय भाषणातून लोखंडे सरांनी सर्व विद्यार्थ्यांना जागृत केले आणि आपल्या आरोग्याची काळजी घ्यावी हा मोठा संदेश दिला त्याचप्रमाणे आर के लोखंडे सरांनी आपण आहार विहार व्यवस्थित घ्यावा आणि आपल्या नातवांना चांगले सुसंस्कारित बनवावं असा संदेश दिला

# आळंदीतील वाहतूक कोंडीचा बळी

## माजी सीआरपीएफ जवान चौरे यांचा दुर्दैवी मृत्यू

आळंदी : (स. गांवकरी)



आळंदी तीर्थक्षेत्र देवदर्शनासह आता लग्नाचे शहर म्हणून ओळखू लागले आहे. आळंदी शहरातील वाढत्या वाहतूक कोंडी मुळे एका कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळल्याची हृदय द्रावक घटना समोर आली आहे. यात भिमाजी तुकाराम चौरे ( वय ५९ वर्षे ), जे केंद्रीय राखीव पोलीस दल (CRPF) मधून २२ वर्षे देशसेवा करून निवृत्त झाले होते, यांचे गंभीर हृदयविकाराच्या झटक्यामुळे निधन झाले. मात्र त्यांना वेळेत उपचार न मिळाल्या मुळे त्यांचा जीव गेला असल्याचा गंभीर आरोप कुटुंबीयांनी केला आहे.

चौरे कुटुंबीय आळंदीतील पद्मावती रोड, जगन्नाथ पार्क येथे रहात आहेत. मिळालेल्या माहिती नुसार, भिमाजी चौरें यांना घरीच अचानक तीव्र हृदयविकाराचा झटका आला. त्यांना तातडीने रुग्णालयात नेण्याची गरज होती. घरा जवळच के.के. हॉस्पिटल अवघ्या १ किलोमीटर अंतरावर असतानाही, पद्मावती रोडवरील प्रचंड वाहतूक कोंडीमुळे त्यांना वेळेत पोहोचवणे अशक्य झाले.

त्या दिवशी परिसरातील अनेक मंगल कार्यालयांमुळे रस्त्यावर प्रचंड गर्दी झाली होती. चार चाकी वाहनातून रुग्णालयात नेण्याचा प्रयत्न निष्फळ ठरल्याने कुटुंबीयांनी वाहन रस्त्याच्या कडेला सोडून देत, भिमाजी चौरें यांना ऑटो रिक्षामध्ये हलवावे लागले. परिस्थिती इतकी बिकट होती की, रिक्षाला वाट मिळावी म्हणून त्यांच्या पत्नी आणि मुलीला रस्त्यावर धावत जाऊन वाहने बाजूला करण्याची विनवणी करावी लागली.

अवघ्या १ किलोमीटरचा प्रवास पूर्ण करण्यासाठी तब्बल २० मिनिटे लागली. या विलंबामुळे भिमाजी चौरे यांना वेळेत वैद्यकीय मदत मिळू शकली नाही आणि त्यांचा उपचारा पूर्वीच मृत्यू झाला. या घटनेमुळे आळंदीतील वाहतूक व्यवस्थेचा गंभीर प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. पद्मावती रोडवरील वाढत्या मंगल कार्यालयांमुळे होणारी वाहतूक कोंडी ही स्थानिकां साठी रोजची डोकेदुखी बनली आहे. आपत्कालीन परिस्थितीत रुग्णवाहिका किंवा वैयक्तिक वाहनांना मार्ग मिळणे कठीण होत असल्याचे नागरिकांनी सांगितले. स्थानिक नागरिकांनी प्रशासनाकडे तात्काळ उपाय योजना करण्याची मागणी केली आहे. विशेषतः, पद्मावती रोड वरील वाहतूक नियंत्रण, पार्किंगची योग्य व्यवस्था, आणि मंगल कार्यालयांच्या व्यवस्थापनावर निर्बंध घालण्याची गरज सामाजिक कार्यकर्ते शशिकांतभाऊ घुंडरे पाटील यांनी व्यक्त केली. या पूर्वी ही या भागात अपघात होऊन वाहतुकीचे नियोजन अभावी बळी गेले आहेत. । देशसेवा केलेल्या एका निवृत्त जवानाचा जीव वाहतूक कोंडी मुळे जाणे ही अत्यंत दुर्दैवी बाब असून, यापुढे अशी घटना घडू नये या साठी प्रशासनाने त्वरित पावले उचलावीत, अशी जोरदार मागणी नागरिकां कडून होत आहे. त्यांचे मागे पत्नी, दोन मुले, एक मुलगी असा परिवार आहे. त्यांचे पार्थिवावर आळंदी येथील स्मशानभूमीत रविवारी शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

## कुमशेत शाळेत स्वागत, निरोप समारंभ व विविध कार्यक्रम

शिवनेरी : (स. गांवकरी)



जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कुमशेत येथे इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ आणि इयत्ता पहिलीत दाखल होणाऱ्या नवागत विद्यार्थ्यांचा स्वागत सोहळा आनंददायी वातावरणात पार पडला.

सन १९९० पासून प्रलंबित जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कुमशेत जागेचा विषय ग्रामपंचायत कुमशेत व ग्रामस्थांच्या माध्यमातून सोडविण्यात आला . यावेळी जागा मालकांचा सत्कार करण्यात आला.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येथे शालेय इमारत दुरुस्ती व शाळा विकासासाठी आर बी आय बँकेतील माजी अधिकारी खंडू विठोबा भगत यांनी ३ लक्ष रु , कै. हरिभाऊ लक्ष्मण डोके यांच्या स्मरणार्थ माजी संचालक शिवाजी हरिभाऊ डोके, कैलास हरिभाऊ डोके व लीलाबाई बबन भांबरे यांच्या कुटुंबाकडून १ लाख रु व उद्योजक बाळा सुदाम डोके यांनी १ लाख रुपये देणगी जमा केली. सरपंच रविंद्र डोके , ग्रामपंचायत सदस्य व पत्रकार राजेश डोके, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष आशितोष डोके, उपाध्यक्ष शिवकन्या वाणी, माजी अधिकारी सुभाष डोके , माजी संचालक शिवाजी डोके , प्रियंका डोके, हर्षदा डोके, प्रज्ञा डोके, स्वाती डोके, मंदा नाईकवाडी, आदी पालक विद्यार्थी व ग्रामस्थ उपस्थित होते.

इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन करत शाळेबद्दलची कृतज्ञता व्यक्त केली. शाळेसाठी चप्पल स्टँड, बकेट यांसारख्या उपयुक्त वस्तू भेट देऊन त्यांनी आपुलकीचे दर्शन घडवले.

विद्यार्थी रिया दुधाळ, वेदश्री डोके, विराज वाणी, प्रसाद डोके, तनुज डोके व साई डोके यांनी मनोगतातून शाळेतील गोड आठवणींना उजाळा देत उपस्थितांना भावूक केले. यावेळी इयत्ता पहिलीतील ११ नवागत विद्यार्थ्यांचे गुलाब पुष्प व 'शब्दबाग' पुस्तक देऊन प्रेमपूर्वक स्वागत करण्यात आले. त्यामध्ये साईराज नाईकवाडी, प्राची डोके, सह्याद्री डोके, आरुष डोके, शिवांश डोके, अविरत डोके, स्वरुप डोके, स्वराज डोके, अर्णव नाईकवाडी, इकरा इनामदार आणि साई वाणी इत्यादी १००% दाखल पात्र विद्यार्थी दाखल झाले.

साई कला आविष्कार नाट्य संस्था पुणे आयोजित आहिल्यादेवी होळकर चित्ररंगभरण .स्पर्धेतील विजेत्या प्रथम वेदश्री डोके,व्दितीय ईश्वरी शेलार, तृतीय . शंतनू डोके व कृष्णा डोके या विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी माजी अंगणवाडी सेविका सुलोचना डोके , माजी अधिकारी सुभाष डोके, सरपंच रवींद्र डोके , ग्रामपंचायत सदस्य राजेश डोके व कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी आरबीआय बँक अधिकारी खंडू भगत यांनी मनोगत व्यक्त केले .

प्रस्तावना उपशिक्षक श्याम लालपोड , सूत्रसंचालन विद्यार्थीनी श्रुती डोके व आभार मुख्याध्यापक यश घोडे यांनी मांडले.

## वैष्णवधाम येथे निवासी बाल संस्कार शिबिराचे आयोजन

जुन्नर तालुका : (स. गांवकरी)

वैष्णवधाम (पारुंडे) येथील गुरुवर्य वै.कोंडाजी बाबा डेरे वारकरी शिक्षण संस्थेत गत पाच वर्षापासून मुले,मुलींसाठी अध्यात्मिक व शैक्षणिक निवासी बाल संस्कार शिबिराचेआयोजन केले जाते.याही वर्षी २७ एप्रिल पासून १२ दिवसांचे शिबिर आयोजित केल्याची माहिती संस्थेचे व्यवस्थापक शंकर पवार यांनी दिली. या निवासी शिबिरात शारीरिक शिक्षण,योगा,संत तुकाराम गाथा पारायण,भगवद गीतेतील १२ वा,१५ वा अध्याय चे निरूपण आरती पाठांतर, हनुमानचालीसा मारुती स्तोत्र पठण,संतांचे जीवन चरित्र, प्रवचन,व्याख्याने, हरिपाठ याबरोबर तालुक्यातील विविध तीर्थस्थानांना भेट, अंधश्रद्धा व मानव अशा विविध विषयांवर सामाजिक धार्मिक उपक्रम राबविले जाणार आहेत. या बालसंस्कार शिबिरात ह.भ.प.सारिका पवार,ह.भ.प. तुषार महाराज साळुंके,डॉ. प्रा. मंगल डोंगरे ह.भ.प.स्वप्निल दातखिळे,डॉ.दिलीप कचेरे, मेघनाथ जाधव सूत्रसंचालक रामकृष्ण भागवत डॉ.मोहम्मद जाफरी जादूगार,डॉ.एफ.बी. आतार,ह.भ.प.पोपट महाराज खंडागळे यांचे समारोपाच्या दिवशी प्रवचन आपल्याला ऐकायला मिळणार आहे. त्याच बरोबर योगाच्या बाबतीत प्रा. एकनाथ डोंगरे,मल्हारी चव्हाण, सुनील पवार,ह.भ.प.रमेश महाराज ढोमसे,वैशाली बिडवई. शितल पवार हे मार्गदर्शन करणार आहेत.हे निवासी शिबिर यशस्वी पार पाडण्या साठी नेहमीप्रमाणे डिसेंट फाऊंडेशनचे संस्थापक जितेंद्र बिडवई,उद्योजक बाळासाहेब खिलारी,जुन्नर तालुका ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष प्रा. एकनाथ डोंगरे,शंकर साळुंके धनंजय राजूरकर,रोटरी ऑफ जुन्नर शिवनेरी चे शिरीष जठार, संतोष रासने,सुभाष बोकरीया परिवार,आतार परिवार यांचे सहकार्य लाभणार आहे.

# आमदार रोहित पवार यांच्या हस्ते मयूर भोसले यांना रँक प्रदान

## जामखेडच्या नागेश विद्यालयात उत्साही सोहळा

जामखेड : (स. गांवकरी)

रयत शिक्षण संस्थेचे श्री नागेश विद्यालय, जामखेड येथील राष्ट्रीय छात्र सेना(आर्मी)चे ऑफिसर मयूर कृष्णाजी भोसले यांना एनसीसीमध्ये 'सेकंड ऑफिसर' पदी पदोन्नती मिळाल्याबद्दल, रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य तथा आमदार रोहित दादा पवार यांच्या शुभहस्ते त्यांना स्टार लावून रँक प्रदान करण्यात आली.

मयूर भोसले यांनी नागपूर येथील 'कामठी ऑफिसर ट्रेनिंग अकॅडमी' (OTA) मध्ये आपले खडतर प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केले. त्यानंतर त्यांची 'थर्ड ऑफिसर' वरून 'सेकंड ऑफिसर' पदी नियुक्ती करण्यात आली आहे. या गौरव सोहळ्यानिमित्त जामखेड परिसरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव. होत आहे. सतरा महाराष्ट्र बटालियनचे सी ओ कर्नल प्रसाद मिराज यांनी भोसले सरांचे विषेश कौतुक केले.



सामाजिक कार्याची दखल: आ. रोहित पवार यावेळी शुभेच्छा देताना आमदार रोहित पवार म्हणाले, "एनसीसी ऑफिसर मयूर भोसले हे केवळ एक शिक्षक नसून ते सामाजिक उपक्रम व स्वछता उपक्रमात नेहमीच अग्रेसर असतात. एनसीसीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती आणि शिस्त रुजवण्याचे मोलाचे कार्य ते करत आहेत. त्यांच्या पुढील वाटचालीस आणि लवकरात लवकर पुढील प्रमोशन मिळावे यासाठी माझ्याकडून खूप शुभेच्छा."

मयूर भोसले यांनी एनसीसीच्या माध्यमातून अनेक जागतिक विक्रम प्रस्थापित केले आहेत:

इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड:- देशातील सर्वात मोठा प्रजासत्ताक दिन साजरा करून त्याची नोंद इंडिया बुक ऑफ रेकॉर्डमध्ये केली.

आशिया बुक ऑफ रेकॉर्ड: - मानवी रचनेतून जगातील सर्वात मोठा भारताचा नकाशा साकारून जामखेडचे नाव जागतिक स्तरावर चमकवले. कलात्मक सहभाग:- महापुरुषांच्या जयंती निमित्त नागेश विद्यालयातील राजमाता जिजाऊंचे भव्य चित्र आणि खर्डा येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या भव्य चित्राच्या निर्मितीत त्यांचा मोलाचा सहभाग होता.

कोविड मधील कार्य :- कोव्हिड-१९ च्या काळात त्यांनी रयत कोविड माहिती व मदत केंद्राचे समन्वयक म्हणून उल्लेखनीय काम केले आहे. अनावश्यक खर्च टाळून मुलीच्या वाढदिवसानिमित्त 24 ऑक्सिजन सिलेंडर आरोळे कोविड हॉस्पिटलला मदत केली. एक शिस्तप्रिय शिक्षक आणि विद्यार्थ्यांना संरक्षण क्षेत्रात करिअर करण्यासाठी सातत्याने प्रोत्साहित करणारे मार्गदर्शक म्हणून मयूर भोसले यांची ओळख आहे.व जामखेड तालुका कलाशिक्षक संघटनेच्या अध्यक्ष पदाची धुरा त्यांचाकडे आहे. त्यांच्या या यशाबद्दल जामखेड करांकडून त्यांचे विशेष कौतुक होत आहे.

# किनवट नगरपरिषदेत विशेष सभा

■ महाविकास आघाडीच्या कोट्यातून प्रशांत कोरडे यांची नामनिर्देशित सदस्यपदी नियुक्ती



किनवट : (स. गांवकरी)

किनवट नगरपरिषदेच्या नामनिर्देशित सदस्यांची नियुक्ती करण्यासाठी आज पार पडलेल्या विशेष सभेत महाविकास आघाडीच्या कोट्यातील प्रलंबित एका स्वीकृत सदस्याची निवड पूर्ण करण्यात आली. या प्रक्रियेत किनवट शहर विकास आघाडीचे प्रशांत सुरेशराव कोरडे यांची नामनिर्देशित सदस्य अध्यक्षा तथा पिठासीन अधिकारी सुजाता विनोद येड्रलवार यांच्या अध्यक्षतेखाली ही विशेष सभा पार पडली. दि. 21 एप्रिल 2026 रोजी दिलेल्या नोटीसीनुसार बोलाविण्यात आलेल्या या सभेस एकूण 23 पैकी 20 सदस्य उपस्थित होते. महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 च्या कलम 81(9) नुसार आवश्यक गणपूर्ती पूर्ण झाल्याने सभेचे कामकाज सकाळी 11.00 वाजता सुरू करण्यात आले. सभेत नमूद करण्यात आले की, दि. 14 जानेवारी 2026 रोजी झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेत नगरपरिषदेसाठी दोन नामनिर्देशित सदस्यांची संख्या निश्चित करण्यात आली होती. त्यापैकी एक सदस्य यापूर्वीच नियुक्त करण्यात आला असून उर्वरित एका जागेसाठी आजची निवड प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. उपविभागीय अधिकारी (नगरपालिका प्रशासन) कार्यालय, जिल्हाधिकारी नांदेड यांच्याकडून प्राप्त नामनिर्देशन प्रस्तावांची छाननी करून वैध प्रस्ताव सभेसमोर वाचून दाखविण्यात आला. त्यानुसार प्रशांत सुरेशराव कोरडे यांचा प्रस्ताव वैध ठरल्याने त्यांची नामनिर्देशित सदस्यपदी नियुक्ती जाहीर करण्यात आली.



ठाणे : उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे व खासदार श्रीकांत शिंदे तसेच स्थानिक आमदार राजेश मोरे यांच्या सहकार्याने ठाणे महापालिकेच्या दिवा प्रभाग क्रमांक २९ मधील मा. उपमहापौर तथा शहरप्रमुख रमाकांत मढवी यांच्या प्रमुख उपस्थितीत अनेक लोकांपयोगी कामांचे भूमिपूजन करण्यात आले.

## थोडक्यात बातम्या...



### डॉ. बाबासाहेब आंबेडकर पदस्पर्शभूमी सोहळा उत्साहात; हजारोंची उपस्थिती!

कोतुळ (स. गांवकरी) : विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पदस्पर्श सेवाभावी संस्था, कोतुळ यांच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर पदस्पर्शभूमी सोहळा मोठ्या उत्साहात व भक्तिभावाने संपन्न झाला. मुक्ताई माता मंदिराजवळील वडाच्या झाडाखाली डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी गावकऱ्यांशी संवाद साधला होता, त्या ऐतिहासिक स्थळावरून दरवर्षीप्रमाणे यंदाही प्रतिमेची भव्य मिरवणूक काढण्यात आली. लेझीम पथक, आदिवासी नृत्य, काठी फिरवण्याचे पारंपरिक सादरीकरण आणि ढोल-ताशांच्या गजरात निघालेल्या मिरवणुकीने संपूर्ण परिसर दणाणून गेला. सकाळी पंचशील ध्वजारोहणानंतर मिरवणूक काढण्यात आली व त्यानंतर अभिवादन सभेचे आयोजन करण्यात आले. सभेस राज्यसभा खासदार डॉ. ज्योतीताई वाघमारे, आमदार डॉ. किरण लहामटे, ॲड. संघराज रुपवते, प्रा. मुकुंद भारसाकळे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. त्यांनी डॉ. आंबेडकरांच्या विचारांचा जागर करून समाजाने शिक्षण, संघटन आणि संघर्षाचा मार्ग स्वीकारावा, असे आवाहन केले. या सोहळ्यासाठी कोतुळ व परिसरातील ग्रामस्थ, महिला, युवक, ज्येष्ठ नागरिक आणि विचारवंत मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. उपस्थितांसाठी भोजनाची व्यवस्था करण्यात आली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अध्यक्ष नवनाथ वैराळ, उपाध्यक्ष गौतम रोकडे, सचिव गणेश साळवे व संपूर्ण समितीने विशेष परिश्रम घेतले.

### वडगाव सावताळ येथील प्राथमिक शाळेत गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

पारनेर (स. गांवकरी) : पारनेर तालुक्यातील वडगाव सावताळ येथील जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळेत एनएसई ओलंपियाड, लक्षवेध, मंथन, मिशन आरोप व प्रज्ञाशोध या विविध स्पर्धात्मक परीक्षांमध्ये उत्कृष्ट यश मिळवणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा आयोजित करण्यात आला होता. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुका उपाध्यक्ष श्री. रवींद्र राजदेव यांच्या हस्ते या यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला परीक्षेमध्ये यशस्वी असणाऱ्या विद्यार्थ्यांना भेटवस्तू देऊन प्रोत्साहन देण्यात आले. तसेच उपस्थित सर्व विद्यार्थ्यांसाठी रवींद्र राजदेव यांच्या माध्यमातून खाऊचे वाटपही या ठिकाणी करण्यात आले या परीक्षांमध्ये प्रथम क्रमांक पटकावणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये विराज बाबासाहेब साकोरे (इयत्ता पहिली), अरविंद ज्ञानेश्वर हार्दिक (इयत्ता चौथी), पूर्व बाबासाहेब साकोरे (इयत्ता चौथी) आणि दर्शनी संदीप खंडागळे (इयत्ता तिसरी) यांचा विशेष गौरव करण्यात आला. श्री. रवींद्र राजदेव यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना म्हटले की, "लहान वयातच असे उत्कृष्ट यश मिळवणे हे तुमच्या मेहनत, बुद्धिमत्ता आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनाचे फळ आहे. भविष्यातही सातत्याने प्रयत्न करत राहा, तुमचे उज्ज्वल भवितव्य निश्चित आहे." त्यांनी सर्व विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा प्रवक्ते मोहन रोकडे, डिजिटल मीडियाचे जिल्हाध्यक्ष विनोद गायकवाड, तालुका उपाध्यक्ष श्रीनिवास शिंदे, शाळेचे मुख्याध्यापक श्री. पोटे सर, बाळू जाधव सर, सोपान राऊत सर, श्रीमती तराळ मॅडम, श्रीमती लोखंडे चूर मॅडम, श्रीमती दातीर मॅडम, श्री. हारदे सर, पायमोडे सर आदी मान्यवर उपस्थित होते. शाळेतील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाला उत्साहपूर्ण वातावरण लाभले.

### इस्माईल फकीरभाई बेपारी बेल्हेकर यांचा रवींद्र राजदेव यांच्या हस्ते सत्कार

पारनेर (स. गांवकरी) : राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुका उपाध्यक्ष श्री. रवींद्र राजदेव यांच्या हस्ते बेल्हे येथील प्रसिद्ध ताशा सम्राट इस्माईल भाई बेपारी यांचा सत्कार करण्यात आला. इस्माईल भाई बेपारी हे बऱ्याच वर्षांपासून शारीरिक बाधेमुळे आठ ते दहा वर्षांपासून कोणत्याही ताफ्यात ताशा वाजवताना दिसत नाहीत. मात्र त्यांच्या कलेचा इतिहास अत्यंत समृद्ध आहे. जुना इतिहास पाहिला तर त्यांच्या सारखा ताशा सम्राट पुन्हा होणे कठीण आहे, असे जाणकार सांगतात. त्यांनी ज्या ताशा कलेला जोपासले आणि उंचीवर नेले, ती कला आज महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यापर्यंत पोहोचली आहे. त्यांच्या माध्यमातून अनेक युवा ताशा वादक तयार झाले आणि त्यांनीही राज्यभर आपला ठसा उमटवला आहे. शारीरिक अडचणी असूनही कलेच्या क्षेत्रात दिलेल्या अमूल्य योगदानाबद्दल रवींद्र राजदेव यांनी त्यांच्या राहत्या घरी जाऊन इस्माईल भाई बेपारी यांचा सत्कार केला. यावेळी त्यांना भेटवस्तू देऊन मान्यवरांनी आदर व्यक्त केला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा प्रवक्ते मोहन रोकडे, गाडी घुंगराची फेम गायक विलास अटक, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ डिजिटल मीडिया जिल्हाध्यक्ष विनोद गायकवाड, तालुका उपाध्यक्ष श्रीनिवास शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते. रवींद्र राजदेव यांनी म्हटले की, "इस्माईल भाईंनी ताशा कलेला दिलेले योगदान अमर आहे. त्यांच्या कलेने अनेक पिढ्यांना प्रेरणा दिली आहे. अशा कलावंतांचा सन्मान करणे हे आपले कर्तव्य आहे." हा सत्कार कलाक्षेत्रातील ज्येष्ठ कलावंतांच्या योगदानाची आठवण करून देणारा ठरला. उपस्थितांनी इस्माईल भाई बेपारी यांच्या तब्येतीसाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.

## नारायणगाव बसस्थानकातून महिलेचे सोने लंपास!

नारायणगाव : (स. गांवकरी)



नारायणगाव (ता. जुन्नर) येथील बसस्थानकावर मंगळवारी दुपारी एकच्या सुमारास प्रवाशांच्या गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने महिलेच्या पर्समधून तब्बल १६ लाख ९४ हजार रुपयांचे सोन्याचे दागिने चोरून नेल्याची घटना घडली.

याबाबत मिरा गणपत शिंदे (वय ४८, रा. इंद्रधनुष्य अपार्टमेंट, नेरूळ, नवी मुंबई; मूळ रा. बोरी खुर्द साळवाडी, ता. जुन्नर) यांनी फिर्याद दिली आहे.फिर्यादी मिरा शिंदे या दुपारी मुंबई बसमधून नारायणगाव बस स्थानकावर उतरल्या, त्यांनतर त्या उसाचा रस पिण्यासाठी समोरच्या गुऱ्हाळावर गेल्या,त्यानंतर त्या झापवाडी बसमध्ये चढल्या, घरी नातेवाईकांचे लग्न असल्याकारणाने त्यांनी पिशवी उघडून पाहिले असता दागिने गायब झाल्याचे त्यांना आढळून आले. त्यांनंतर पुन्हा नारायणगाव येथे येऊन त्यांनी पोलीस ठाण्यात चोरीची फिर्याद दिली. चोरीस गेलेल्या दागिन्यांमध्ये सुमारे ६.३० लाख रुपये किंमतीची दोन मंगळसूत्रे (प्रत्येकी ४.५ तोळे), १.४० लाखांचे एक मंगळसूत्र (२ तोळे), १.४० लाखांची बोरमाळ, १.४० लाखांच्या दोन बांगड्या, २.२४ लाखांचा राणीहार, ३.५० लाखांच्या दोन अंगठ्या आणि ७० हजारांचे झुमके यांचा समावेश आहे.

या प्रकरणी अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी तपास सुरू केला आहे. बसस्थानक परिसरातील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपीचा शोध घेण्याचे काम सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली.मात्र त्यावेळी त्या चढत असलेल्या बसशेजारीच दुसरी बस उभी असल्याने सीसीटीव्ही चित्रीकरण झालेले नाही. या घटनेमुळे बसस्थानक परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून सलग दोन दिवस दागिने चोरीचे प्रकार घडले असून यापूर्वीही अशा अनेक चोऱ्या झालेल्या असल्याने प्रवासी वैतागले आहेत.

प्रवाशांनी आपल्या मौल्यवान वस्तूंची विशेष काळजी घेण्याचे आवाहन नारायणगाव पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीण सपांगे यांनी केले आहे.

## सुजित झावरे यांनी वीज खंडितप्रकरणी अधिकाऱ्यांना धरले धारेवर



पारनेर : (स. गांवकरी)

पारनेर तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून सायंकाळी ६ ते १० या वेळेत सातत्याने वीज पुरवठा खंडित होत असल्याने नागरिक प्रचंड त्रस्त झाले आहेत. या वारंवार होणाऱ्या खंडित पुरवठ्यामुळे घरगुती तसेच व्यावसायिक कामकाज ठप्प होत असून नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. या गंभीर प्रश्नावर सुजित झावरे पाटील यांनी आक्रमक भूमिका घेत थेट नगर येथील वीज वितरण कंपनीच्या कार्यालयात धडक देत कार्यकारी अभियंता श्री. योगेश चव्हाण यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी नागरिकांच्या तीव्र भावना अधिकाऱ्यांसमोर मांडत वारंवार होणाऱ्या वीज खंडितप्रकरणी जबाबदारी निश्चित करण्याची मागणी केली. तसेच, तातडीने ठोस उपाययोजना न झाल्यास आंदोलनाचा इशाराही दिला. यावर कार्यकारी अभियंता श्री. योगेश चव्हाण यांनी परिस्थितीची दखल घेत आज किंवा उद्यापासून वीज पुरवठ्याच्या वेळापत्रकात बदल करून समस्या कमी करण्याचे आश्वासन घेऊनच सुजित झावरे पाटील कार्यालयातून बाहेर पडले.

## नीट 2026 प्रवेश परिक्षार्थींची होणार वैद्यकीय तपासणी

नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)

नीट (युजी)-2026 प्रवेश परीक्षा काळात प्रतिबंधित वस्तूच्या वापरांवर प्रशासनाचे कडक लक्ष असून, इलेक्ट्रॉनिक, ब्लूटूथ वापर बंदी करण्यासाठी परीक्षार्थींची वैद्यकीय तपासणी होणार आहे. जर परीक्षा केंद्रावर प्रतिबंधीत करण्यात आलेल्या वस्तू परीक्षार्थीकडे आढळून आल्यास तो अनुचित साधनांचा वापर मानला जाईल. नियमानुसार व कायद्यानुसार संबंधित उमेदवाराविरुध्द कारवाई करण्यात येईल. याची नोंद सर्व परीक्षार्थींनी घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे. राष्ट्रीय परीक्षा एजन्सी नवी दिल्ली मार्फत आयोजित नीट (युजी)-2026 प्रवेश परीक्षा नांदेड जिल्ह्यात 3 मे 2026 रोजी दुपारी 2 ते 5 या कालावधीत आयोजित करण्यात आलेली आहे. सदरील परीक्षेकरिता नांदेड जिल्ह्यात एकूण 46 केंद्र असून त्यापैकी नांदेड शहरात 24 परीक्षा केंद्रे तसेच ग्रामीण भागात 22 परीक्षा केंद्र अशी एकूण 46 परीक्षा केंद्र निश्चित करण्यात आलेली आहेत. NEET UG-2026 प्रवेश परीक्षेसाठी पात्र उमेदवारांनी 3 मे 2026 रोजी परीक्षा केंद्रावर सकाळी ठीक 11 वाजता रिपोर्टींग करावे. स.11 ते 1.30 ही वेळ परिक्षार्थीची तपासणीची वेळ राहील. परीक्षा केंद्रावर परीक्षा कालावधीत परीक्षार्थी मार्फत कोणत्याही गैर मार्गाचा अवलंब होऊ नये. जसे की, इलेक्ट्रॉनिक उपकरणांचा, ब्लूटूथचा वापर तसेच मनगटी डिजिटल घडयाळीचा वापर करण्याचे परीक्षार्थी यांनी कटाक्षाने टाळावे तसेच वरील बाबींना आळा घालण्यासाठी परीक्षार्थी यांची परीक्षा केंद्रावर वैद्यकीय अधिकारी यांचे मार्फत कान, नाक, घसा संबंधाने (ENT) तज्ञांकडून तपासणी केली जाणार आहे याची सर्व परीक्षार्थ्यांनी नोंद घ्यावी. उमेदवारांना कोणत्याही परिस्थितीत नीट (युजी)-2026 प्रवेश परीक्षा केंद्रामध्ये खालील वस्तू घेऊन जाण्याची परवानगी असणार नाही. उदा. मजकूर साहित्य, मुद्रित किंवा लिखित कागदाचे तुकडे, भूमिती पेन्सिल, बॉक्स, प्लास्टिक पाऊच, कॅल्क्युलेटर, स्केल, लेखन पॅड, पेन ड्राईव्ह, कॅल्क्युलेटर लॉग टेबल, इलेक्ट्रॉनिक पेन स्कॅनर इत्यादी कोणतीही स्टेशनरी वस्तू उमेदवारांनी परीक्षा केंद्रावर आणू नये.

## महाराष्ट्राच्या मावळ्यांचे जिंजीकडे प्रस्थान

### ११३३ स्वयंसेवकांचा समावेश : सीमापार गडसंवर्धनाचा नवा अध्याय

पारनेर : (स. गांवकरी)



शहरातील कायनेटिक चौक येथे बुधवारी "शिवकालीन गडकोट संवर्धन मोहीम" अंतर्गत तामिळनाडूतील जिंजी किल्ल्याकडे रवाना होणाऱ्या स्वयंसेवकांच्या बसेसचे ध्वजप्रदर्शन आणि प्रस्थान सोहळा उत्साहात पार पडला. खासदार नीलेश लंके आणि शिवसेना नेते प्रा. शशिकांत गाडे यांच्या हस्ते नारळ फोडून भगवे झेंडे दाखवत बसेस रवाना करण्यात आल्या. तब्बल १ हजार १३३ मावळ्यांच्या उपस्थितीने परिसर देशभक्तीच्या वातावरणाने भारावून गेला. महाराष्ट्राच्या सीमांबाहेर प्रथमच गडकोट संवर्धनाचा उपक्रम राबविण्यात येत असून तामिळनाडूतील जिंजी किल्ला येथे स्वच्छता, संवर्धन आणि जतनाची कामे करण्यात येणार आहेत. सुमारे १ हजार २०० किलोमीटरचा एकमार्गी आणि एकूण २ हजार ४०० किलोमीटरचा हा प्रवास "आपला मावळा" संघटनेची आतापर्यंतची सर्वात मोठी आणि दूरची मोहीम ठरत आहे. आवश्यक साहित्य व उपकरणांसह स्वयंसेवक पूर्ण तयारीनिशी रवाना झाले असून महाराष्ट्र दिन जिंजी किल्ल्यावर साजरा करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. इतिहासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेल्या जिंजी किल्ल्याला छत्रपतींच्या कालखंडात विशेष स्थान आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्वराज्य परंपरेशी जोडलेला हा किल्ला पुढे छत्रपती राजाराम महाराज यांच्या संघर्षकाळात तात्पुरती राजधानी म्हणून ओळखला गेला. त्यामुळे या ऐतिहासिक स्थळी संवर्धनाची मोहीम राबविणे प्रत्येक मावळ्यासाठी अभिमानाचा क्षण ठरत आहे. यावेळी बोलताना खासदार नीलेश लंके यांनी गडकोट हे इतिहास व स्वाभिमानाचे प्रतीक असल्याचे सांगत, महाराष्ट्रातील १४ गडांवर यशस्वी मोहिमा राबवल्यानंतर आता राज्याच्या सीमांपलीकडे जाऊन वारसा जपण्याचा संकल्प पूर्ण होत असल्याचे नमूद केले. जिंजी किल्ल्यावर सेवा करणे हे भाग्याचे असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. प्रा. शशिकांत गाडे यांनीही या उपक्रमाला चळवळीचे स्वरूप प्राप्त झाल्याचे सांगत, ही मोहीम केवळ स्वच्छतेपुरती मर्यादित नसून सांस्कृतिक जतन आणि इतिहासाची जाणीव पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविणारी असल्याचे अधोरेखित केले. प्रस्थान सोहळ्यास सिताराम काकडे, रामेश्वर निमसे, नगरसेवक योगीराज गाडे, अल्ताफ शेख, सचिन पठारे, समीर वडजे यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. विशेष म्हणजे खा. नीलेश लंके यांनी स्वतः काही अंतर बस चालवून स्वयंसेवकांमध्ये उत्साह निर्माण केला. महाराष्ट्राच्या अस्मितेचा जागर करत देशाच्या विविध भागांत गडकोट संवर्धनाचा संदेश पोहोचविणारी ही मोहीम एक ऐतिहासिक पाऊल मानली जात आहे.

## 'दहावी-बारावीनंतर पुढे काय?' विद्यार्थ्यांना करिअर मार्गदर्शन

### जव्हार तालुक्यातील स्वातंत्र्यसैनिक रेवजीभाई चौधरी जयंतीनिमित्त उपक्रम

पालघर : (स. गांवकरी)



जव्हार तालुक्यातील सारसून परिसरातील जांभ्याचा पाडा येथे स्वातंत्र्यसैनिक रेवजीभाई चौधरी यांच्या ११६व्या जयंतीनिमित्त विविध सामाजिक व शैक्षणिक उपक्रम उत्साहात पार पडले. स्वातंत्र्यसैनिक रेवजीभाई चौधरी सामाजिक प्रतिष्ठान, खरवंद (ता. जव्हार, जि. पालघर) यांच्या वतीने रविवारी (दि. २६ एप्रिल) निबंध स्पर्धा, बक्षीस वितरण, विद्यार्थ्यांना खाऊ वाटप तसेच 'दहावी-बारावीनंतर पुढे काय?' या विषयावर मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात रेवजीभाई चौधरी आणि क्रांतिसूर्य बिरसा मुंडा यांच्या प्रतिमांना पुष्पार्पण करून करण्यात आली. १९४२ च्या स्वातंत्र्य लढ्यात धैर्याने सहभाग नोंदवत "ढाण्यावाघ" म्हणून ख्याती मिळवलेल्या रेवजीभाई चौधरी यांच्या कार्याचा यावेळी गौरवपूर्वक उल्लेख करण्यात आला.

या प्रसंगी सामाजिक कार्यकर्ते मनोज कामडी यांचा प्रतिष्ठानच्या वतीने सत्कार करण्यात आला. तसेच जि.प. शाळा जांभ्याचापाडा येथील विद्यार्थी, दहावी-बारावीची परीक्षा दिलेले विद्यार्थी आणि ग्रामस्थ यांनी व्यसनमुक्तीची शपथ घेतली. यावेळी दोन अनाथ विद्यार्थ्यांना दत्तक घेण्याची घोषणाही करण्यात आली. प्रतिष्ठानकडून वर्षभर विविध सामाजिक उपक्रम राबविले जात असून त्यामध्ये करिअर मार्गदर्शन शिबिरे, महिला सक्षमीकरण, आरोग्य शिबिरे, बालसंस्कार वर्ग आणि शैक्षणिक साहित्य वाटप यांचा समावेश असल्याचे यावेळी सांगण्यात आले. कार्यक्रमास प्रतिष्ठानचे अध्यक्ष विष्णू चौधरी, सचिव नारायण शेंडे, मनश्री चौधरी, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते गोविंद अवतार, घाटाळ सर, जि.प. शाळेचे शिक्षकवृंद, मनोज कामडी, पत्रकार प्रमोद मौळे तसेच ग्रामस्थ व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन काशिनाथ शेंडे यांनी केले. मनोज कामडी, प्रमोद मौळे आणि मनश्री चौधरी यांनी आयटीया चे भविष्यातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. शेवटी राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)